9460

## CHALLAN
### MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| GRN | MH014407381202122P | BARCODE | Date 10/03/2022-16:46:42 Form ID |

| | |
|---|---|
| Department | Inspector General Of Registration |
| Type of Payment | Non-Judicial Stamps<br>Duty on doc Voluntarily brought for Adjud IGR RoM |
| Office Name | PND1_JT DISTT REGISTRAR PUNE URBAN |
| Location | PUNE |
| Year | 2021-2022 One Time |

**Payer Details**

| | |
|---|---|
| TAX ID / TAN (If Any) | |
| PAN No.(If Applicable) | AADAS1197G |
| Full Name | SWACH PUNE SEVA SAHAKARI SANSTHA MARYADIT |
| Flat/Block No. | |
| Premises/Building | |
| Road/Street | |
| Area/Locality | KOTHRUD PUNE |
| Town/City/District | |
| PIN | 4 1 1 0 3 8 |
| Remarks (If Any) | ADJUDICATION CASE NO 172/2022 |

| Account Head Details | Amount In Rs. |
|---|---|
| 0030051701 Amount of Tax | 104600.00 |
| Total | 1,04,600.00 |

DEFACED ₹104600.00 DEFACED

| | |
|---|---|
| Amount In Words | One Lakh Four Thousand Six Hundred Rupees Only |

| | |
|---|---|
| Payment Details | SBIEPAY PAYMENT GATEWAY |

**Cheque-DD Details**

| | |
|---|---|
| Cheque/DD No. | |
| Name of Bank | |
| Name of Branch | |

**FOR USE IN RECEIVING BANK**

| | | | |
|---|---|---|---|
| Bank CIN | Ref. No. | 10000502022031003077 | 0796061029540 |
| Bank Date | RBI Date | 10/03/2022-16:47:11 | Not Verified with RBI |
| Bank-Branch | | SBIEPAY PAYMENT GATEWAY | |
| Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID :

Mobile No. : 8888866655

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

### Challan Defaced Details

| Sr. No. | Remarks | Defacement No. | Defacement Date | UserId | Defacement Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | | 0006991035202122 | 11/03/2022-12:16:30 | IGR002 | 104600.00 |

हे प्रमाणपत्र महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, अन्वये असलेल्या नियमांन्वये निर्गमित केलेले आहे. परंतु उक्त दस्त नोंदणीसाठी नोंदणी अधिकाऱ्यासमोर दाखल झाल्यास, नोंदणी अधिनियम, 1908, च्या अधिनियमातील तरतुदीनुसार नोंदणी अधिकारी दस्त नोंदणीची कार्यवाही करतील.

मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर

Received Adjudication Fee RS. (...**100/-**)
Vide e-Challan GRN No – **MH013832108202122E**
**Dated – 28/02/2022**

**Collector of Stamps**
**Pune City**

SEAL OF THE COLLECTOR OF STAMPS * PUNE CITY, PUNE * मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे यांची मुद्रा * पुणे शहर, पुणे

M.V / Consideration Rs.......**5,22,94,000/-....**
Office of the,
Collector of Stamps, Pune City
Case No. Adj ...........**172/2022**.........
Date:- **02/03/2022.**
Received from... **SWACH PUNE SEVA SAHAKARI SANSTHA**
Residing at ...... **MARYADIT**
Stamp duty of Rs.. **(1,04,600/- One Lakh Four Thousand Six Hundred Rupees only......)**
Vide e-Challan GRN No – **MH014407381202122P**
Dated :- **10/03/2022**............
Certified Under Section 32 of the Maharashtra Stamp Act.
That the full duty of **(1,04,600/- One Lakh Four Thousand Six Hundred Rupees only......)**
With which this instrument chargeable as been paid vide
Article...... **5 1[(h)2(A) - (vi)(b)**.....of Schedule.
This Certificate is subject to the provisions of section53(A)
Of the Maharashtra Stamp Act.

**Place :- Pune**
**Date :- 11 /03/2022.**

**Collector of Stamps**
**Pune City**

3150

GRN : MH014407381202122P Amount : 1,04,600.00 Bank : SBIEPAY PAYMENT GATEWAY Date : 10/03/2022-16:46:42

| | Total Defacement Amount | 1,04,600.00 |
|---|---|---|

TOR OF STAMPS
पुणे यांची मुद्रा
★

SEAL OF THE CO

# करार

आज दिनांक .................. माहे ...................... सन २०२२ ते दिवशी,

**पुणे महानगरपालिका**, महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ नुसार स्थापित झालेली नागरी स्वराज्य संस्था (वैधानिक) असून तिचे मुख्य कार्यालय शिवाजीनगर, पुणे ४११००५ आहे (पुढील भागात उल्लेख "पुणे मनपा"), या करारात, केवळ सदर कराराच्या संदर्भाव्यतिरिक्त अपवाद सोडून, "पुणे मनपा" म्हणजे संस्थेचे प्रशासन, अधिकारी आणि उत्तराधिकारी यांनी अधिकृतपणे नेमलेल्या व सदर करारावर स्वाक्षरी करण्यास व त्याची अंमलबजावणीचा अधिकार असलेले अधिकारी श्री. अजित प्रल्हाद देशमुख, उप आयुक्त, (घन कचरा व्यवस्थापन), पुणे महानगरपालिका, ........प्रथम पक्षकार

आणि

**'स्वच्छ'** पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित (नोंदणी क्रमांक PNA (१)GNL/O/१३२१/०७-०८), नियमित सहकारी संस्था असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार दिनांक १७ ऑगस्ट २००७ रोजी रीतसर नोंदणीकृत संस्था असून तिचे कार्यालय तिसरा मजला जुने टिळक रोड मैत्रिय कार्यालय, टिळकरोड, स्वारगेट, पुणे येथे आहे व पॅन क्रमांक AADAS1197G आहे. ही कचरावेचक कामगारांची सहकारी संस्था असून पुणे शहराच्या विविध भागात तिचे सदस्य घनकचरा व्यवस्थापन आणि वर्गीकरणाचे काम करतात (पुढील भागात उल्लेख 'स्वच्छ'), या करारात, केवळ सदर कराराच्या संदर्भाव्यतिरिक्त अपवाद सोडून, 'स्वच्छ' म्हणजे संस्थेचे प्रशासन, अधिकारी आणि उत्तराधिकारी यांनी अधिकृतपणे नेमलेल्या व सदर करारावर स्वाक्षरी करण्यास व त्याची अंमलबजावणीचा अधिकारी असलेल्या पदाधिकारी व्यक्ती श्रीमती सुमन मरीबा मोरे (अध्यक्ष), पॅन क्र. BTXPM2138 आणि श्रीमती सुप्रिया दिलिप भडकवाड (सचिव), पॅन क्र. AWBPB9402G.

·······..द्वितीय पक्षकार

पुढील संदर्भासाठी आवश्यक तेथे, 'पुणे मनपा' आणि 'स्वच्छ' यांचा उल्लेख स्वतंत्रपणे 'पक्ष' आणि एकत्रितपणे 'दोन्ही पक्ष' असा केलेला आहे.

ज्याअर्थी:

A. पुणे मनपा ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, घनकचरा व्यवस्थापन (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० (यापुढे घनकचरा व्यवस्थापन नियम म्हणून उल्लेख) आणि भारतीय संविधान यानुसार नागरी स्थानिक संस्था असून, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन आणि गरिबीनिर्मूलन ही तिची मूलभूत वैधानिक व घटनात्मक जबाबदारी आहे.

B. घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी करणे ही मनपाची जबाबदारी आहे आणि या कामात महापालिकेच्या परिसरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे संकलन, साठवण, वर्गीकरण, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट या सर्वासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करणे ही देखील महापालिकेची जबाबदारी आहे. घरोघरी जाऊन कचरासंकलन, झोपडपट्टी आणि अनधिकृत वस्त्यात तसेच कार्यालये व व्यापारी संकुले व विभाग या ठिकाणचे कचरासंकलन करणे, वर्गीकृत कचऱ्याचा फेरवापर (रिसायकलिंग) व पुनर्वापर करण्यास चालना देणे, नागरिकांना कचरा वर्गीकरणात सहभागी करून घेणे, जैविक कचऱ्याचे कुजखत करणे, गांडूळखते, जीवाणूप्रक्रिया इत्यादि द्वारे डेपो वा भूभरणावरील (कचरा भराव मैदान) भार कमी करणे आणि संमिश्र कचऱ्यातील चांगला व फेरवापर होऊ शकणाऱ्या मालाची योग्य विल्हेवाट लावणे, याही सर्व जबाबदाऱ्या महानगरपालिकेच्या आहेत.

C. महाराष्ट्र जैविकदृष्ट्या अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम, २००६ [महाराष्ट्र नॉन-बायोडिग्रेडेबल गार्बेज (कंट्रोल) ॲक्ट, २००६] नुसार स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने कचरा संकलन केंद्रे उभारणे, संकलनकेंद्राच्याजागी कचरा वर्गीकरण सुरू करणे, कचरावेचक कामगारांना कचरा वर्गीकरणाची व त्यातून मिळालेला जैविकदृष्ट्या अविघटनशील कचरा घेऊन जाण्याची परवानगी देणे आणि कचऱ्याचे विविध प्रकारानुसार नीट वर्गीकरण करता यावे यासाठी पुरेशी मोकळी जागा उपलब्ध करून देणे, अशाही काही जबाबदाऱ्या कायद्याने पुणे मनपावर टाकलेल्या आहेत.

D. महाराष्ट्र सरकारने परिपत्रक क्र. घकव्य १००१/प्र.क्र. ५४६/पपु - २२, दिनांक ५ जानेवारी २००२ नुसारही पुणे मनपावर काही जबाबदाऱ्या येतात. शहरातील कचरावेचकांना संघटित करणे व त्यांच्या सहकारी संस्था तयार करून त्यांची नोंदणी करणे, या सहकारी संस्थांना घरोघरी जाऊन वा दुकाने व व्यापारी आस्थापनातील कचरासंकलनाचे काम देणे, संकलनासाठी गाड्या देणे, कचरावेचकांना कचऱ्यातील फेरवापर/ पुनर्निर्मिती होणारा माल नेण्याची परवानगी देणे, कचरावेचकांना ओळखपत्रे देणे इत्यादि जबाबदाऱ्या या प्रपत्रकाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवलेल्या आहेत.

E. 'स्वच्छ' पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित (द्वितीय पक्षकार), ही कचरावेचक आणि इतर अनौपचारिक फेरवापर क्षेत्रात (असंघटीत कचरा पुनर्निर्मिती क्षेत्रात) काम करणाऱ्या कामगारांची स्वायत्त सहकारी संस्था २००७ मध्ये स्थापन झाली. सदर संस्था पूर्णतः या सदस्यांच्या मालकीची आणि त्यांच्या नियंत्रणाखाली आहे. आपल्या सदस्यांचे जीवनमान व उपजीविका सुरक्षित करण्याचे व उंचावण्याचे काम 'स्वच्छ या प्रमाणे करत आहे : घनकचरा व्यवस्थापन आणि फेरवापर सेवा क्षेत्रामध्ये कामगारांचा अंतर्भाव करून त्यांच्या मार्फत घरोघरचा कचरा संकलन करण्याची सेवा संस्था पुरवते. याच संदर्भात घरोघरी जाऊन नागरिकांना कचरासंकलन सेवा देण्याबाबत पुणे मनपाने २४ सप्टेंबर २००८ रोजी 'स्वच्छ' शी पाच वर्षांचा सामंजस्य करार केला होता.

F. २००८-२०१३ या कालावधीत 'स्वच्छ'च्या घरोघरी कचरा संकलनयंत्रणेमध्ये कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतीच्या एकूण ९५०० कचरा वेचक कामगारांपैकी २३०० कामगारांचा समावेश होता. सध्याच्या परिस्थितीत, पुणे मनपासोबत कोणत्याही प्रकारे औपचारिक व्यवस्था ठरलेली/ करार नसतानाही, 'स्वच्छ'चे २३०० कचरावेचक सदस्य घरोघरी जाऊन कचरासंकलनाची सेवा पुणे शहरातील अंदाजे ४,००,००० नागरिकांना देत होते.

G. पुणे शहरातील प्राथमिक कचरा संकलन 'स्वच्छ'वर पुन्हा सोपवण्याचा प्रकारचा निर्णय पुणे मनपा सर्वसाधारण सभेच्या २४ ऑगस्ट २०१५ च्या बैठक क्र. ३७ मध्ये ठराव क्र.२५७ नुसार १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीकरीताचा करारनामा करण्यात आलेला आहे.

H. दि.३१/१२/२०२० रोजी स्वच्छ संस्थेबरोबरचा करार संपुष्टात आल्यानंतर शहरातील कचरा संकलनाबाबत अडचण व गैरसोय निर्माण होण्याची शक्यता व घरोघरी जावून कचरा संकलनाची यंत्रणा बंद झाली तर स्वच्छ सर्वेक्षण अभियानाअंतर्गत मानांकनावर होणारा परिणाम लक्षात घेता स्वच्छ संस्थेमार्फत कचरा संकलन व प्राथमिक वाहतुकीचे कामकाज पूर्वीप्रमाणेच सुरु ठेवणे आवश्यक आहे. तसेच शहरातील कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव या पार्श्वभूमीवर मा.मुख्य सभेची मान्यता घेऊन पुढील ५ वर्षासाठी स्वच्छ संस्थेसोबत करार करण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. यासाठी स्वच्छ संस्थेसमवेतच्या करारास मा.स्थायी समिती ठराव.क्र. ९५३, दि.१२/०१/२०२१ अन्वये दिनांक १२/०२/२०२१ पर्यंत, मा.स्थायी समिती ठराव क्र. १२३६, दिनांक १६/०२/२०२१ अन्वये दिनांक १३/०३/२०२१ पर्यंत व मा.स्थायी समिती ठराव क्र. १४३८, दिनांक ०९/०३/२०२१ अन्वये दिनांक १२/०५/२०२१ पर्यंत व मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२, दिनांक ०४/०५/२०२१ अन्वये दिनांक १२/०६/२०२१ पर्यंत व मा.स्थायी समिती ठराव क्र.४०५, दिनांक ८/६/२०२१ अन्वये दिनांक १२/०८/२०२१ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे.
मा.महानगरपालिका सभा ठ.क्र. ६५१, दिनांक २२/११/२०२१, मा.महानगरपालिका सभा ठ.क्र.२६, दिनांक २१/०६/२०२१, मा.महानगरपालिका सभा ठ.क्र.४५७, दिनांक २२/०९/२०२१, मा.महानगरपालिका सभा ठ.क्र.३९८, दिनांक २२/०९/२०२१ व मा.महानगरपालिका सभा ठ.क्र.४०२, दिनांक २२/०९/२०२१ नुसार स्वच्छ संस्थेसमवेतच्या कामासाठी दिनांक ०१/०१/२०२१ पासून दिनांक १२/०८/२०२१ या कालावधीसाठीची मा.महानगरपालिका सभेची मान्यता प्राप्त आहे. तसेच मा.महानगरपालिका सभा ठ.क्र. ६५०, दिनांक २२/११/२०२१ अन्वये स्वच्छ संस्थेस दिनांक १३/०८/२०२१ ते २५/१०/२०२२ पर्यंत कामे करून घेणे, देयके अदा करणे व करारनामा करून घेणेस मान्यता प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरून प्रस्तुतचा करार करण्यात आला आहे. तो येणेप्रमाणे

वर नमूद केल्याप्रमाणे आणि यापुढील करारात जी दायित्वे निश्चित केली आहेत, त्यानुसार, दोन्ही पक्षांच्या दरम्यान व दोन्ही पक्षांनी पुढील प्रमाणे मान्य केले आहे की :-

1. **कालावधी:**

   प्रस्तुतच्या कराराचा कालावधी दि. १३/०८/२०२१ ते दि. २५/१०/२०२२ आहे.

2. **'स्वच्छ' संस्थेची सद्यस्थिती**

   a. 'स्वच्छ' पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित ही कचरावेचक आणि इतर अनौपचारिक फेरवापर क्षेत्रात (असंघटीत कचरा पुनर्निर्मिती क्षेत्रात)काम करणाऱ्या कामगारांची स्वायत्त सहकारी संस्था असून, ती सदस्यांच्या मालकीची व त्यांच्या नियंत्रणाखाली आणि नोंदणीकृत नियमांच्या आधारे काम करत आहे. व्यवस्थापन, प्रशासन, आर्थिक, धोरणात्मक किंवा कार्यवाही, कर्मचारी, कचरावेचक सदस्य अशा सर्वच बाबतीत 'स्वच्छ' स्वतंत्रपणे काम करेल. सहकारी संस्थेचे उपविधी , सेवा देण्याच्या अटी व शर्ती (या ठिकाणी ज्या स्पष्टपणे नमूद केल्या आहेत त्याखेरीज), संस्थेचे वर्गणीशुल्क, कर्मचारी धोरण, पदाधिकारी / व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या निवडणुका इत्यादीचे निर्णय 'स्वच्छ' कडून सहकारी संस्थेच्या नियम व कायद्याप्रमाणे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१, यानुसार घेतले जातील.

   b. आपले काम वाढावे, विकसित व्हावे व सातत्याने चालू राहावे यासाठी 'स्वच्छ'च्या वतीने आपल्या सदस्यांना वा सदस्यगटांना प्रोत्साहित करण्याचे व त्यांच्या उद्यमशीलतेला चालना देण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

   c. विकेंद्रित पद्धतीने 'स्वच्छ'संस्था शहरामध्ये काम करेल आणि स्थानिक नागरिक समूह व विविध स्वयंसेवी संस्थांसोबत स्वतंत्रपणे काम करून त्यांना कचरावर्गीकरणासाठी प्रोत्साहित करेल.

   d. घरोघरी कचरा संकलन तसेच अन्य सेवा देण्यासाठी 'स्वच्छ'चे सदस्य स्वतंत्रपणे लघु-उद्योजक म्हणून थेटपणे नागरिकांशी संपर्क साधून काम करतील, त्यांना या कामी 'स्वच्छ'चे कर्मचारी म्हणून नेमले जाणार नाही.

   e. या सेवेसाठी 'स्वच्छ' चे सदस्य संबंधित कुटुंबांकडून किंवा आस्थापनांकडून सेवा शुल्क घेतील. तसेच ठरलेली सेवा देण्यासाठी त्या कुटुंब वा आस्थापनांना ते बांधील असतील. कचरावेचक सभासदांसाठी आणि त्यांच्या वतीने हे सेवा शुल्क स्वीकारण्याचे काम प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने किंवा नागरिकांच्या मागणीनुसार 'स्वच्छ' करू शकेल. ही व्यवस्था सदर करार व सहकारी संस्थाच्या नियमांनुसार असेल.

   f. कचऱ्यातील पुनर्निर्माणयोग्य / फेरवापर करण्यायोग्य वस्तू स्वत:कडे ठेवण्याचा, त्यांची विक्री करण्याचा व त्याचे उत्पन्न घेण्याचा अधिकार 'स्वच्छ'च्या सदस्यांना असेल.